# समर्थ वाड्.मयातील सामर्थ्यांची उपासना

**प्रा. डॉ.मेधा गोसावी**
मराठी विभाग
स्वा. सावरकर महाविद्यालय
बीड

---

संत मांदियाळीमधील एक श्रेष्ठ संतरत्न म्हणजे संत रामदास स्वामी होय. समर्थाची शिकवण त्यांच्या वाड्.मयात आपल्याला सगळीकडे विखुरलेली दिसते.

राजकारण, धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतभूत करणारे संत रामदास हे एकमेव महाराष्ट्रीयन संत होय. नासिक टाकळी येथे बारा वर्षे केलेल्या पुरश्चरणानतर समर्थांनी भारतातील सर्व भागात तीर्थयात्रा केली आणि आपल्या अवती—भवती असलेल्या समाजाचे बारकाईने अवलोकन केले. या काळामध्येच त्यांनी शिष्य करण्यास प्रारंभ केला. तेथे या संप्रदायाच्या संकल्पनाची मूळ प्रेरणा शोधता येते. ही प्रेरणा त्या काळातील इस्लामच्या सार्वत्रिक स्वरुपाच्या धार्मिक व राजकीय आक्रमणांशी संबंधित होती हा या संप्रदायाचा महत्त्वाचा विशेष होय. त्यातच त्याचे वेगळेपण शोधता येते. संत रामदास स्वामींच्या कालखंडाचा जेव्हा आपण स्वतंत्रपणे अभ्यास करतो तेव्हा असे लक्षात येते की, या कालखंडात अवघा महाराष्ट्र अस्मानी, सुलतानी कचाटयात सापडला होता. या काळातील राजकीय,सामाजिक, धार्मिक परिस्थिती अतिशय दुःसह होती आणि अशा ह्या खिळखिळया परिस्थितीमध्ये वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन रामोपासनेच्या बळावर करणारा रामदासी संप्रदाय रामदासांनी सुरु केला. समर्थांचे जे विपूल वाड्.मय आहे. त्यामध्ये प्रामख्याने दोन प्रबल प्रेरणा आढळून येतात. पहिली प्रेरणा म्हणजे निरनिराळया ग्रंथाच्या अभ्यासाची आणि दुसरी प्रेरणा म्हणजे देश स्थितीच्या अवलोकनाची त्यांनी जे विविधांगी लेखन केले आहे. त्यामागे लोकहिताची तळमळ दिसून येते. मानवी सद्‌गुणांची वाढ व्हावी, नैतिकता हा मानवाच्या जगणचा मुलाधार असावा. लोक कर्तृत्व संपन्न आणि परमार्थ प्रवण व्हावेत ही तळमळ त्यामागे आहेच पण समर्थांची शिकवण एवढयावरच थांबत नाही तर त्यांची शिकवण देशकाल आणि वास्तविक परिस्थितीचे भानही ठेवते हे प्रामुख्याने त्यांच्या इतर संप्रदायापेक्षा वेगळेपण आहे असे म्हणता येईल. हरिकथा निरुपण मुख्य मानून त्याला त्यांनी राजकारण आणि सर्वाविषयी सावधपणाची जोड दिली आहे.

''समर्थ वाड्.मयातील नीतितत्वे सगळ्या समाज जीवनाला व्यापणारी आहेत. जीवनाच्या अस्तित्वाला व विकासाला आवश्यक असणाज्या सगळया नैतिक मुल्यांचा पुरस्कार समर्थानी केला. जीवनातील शारीरीक, सामाजिक, आध्यात्मिक या तिन्ही प्रकारच्या नैतिक मुल्यांची जाण समर्थांना असल्याचे आढळते.''[1]

''मध्ययुगीन मराठी भक्तिसाहित्या समर्थांच्या लेखनाने आपले एक व्यवच्छेदक, लक्षणीय स्थान निर्माण केले आहे. समर्थांच्या या लेखनाचे वेगळेपण नि सामर्थ्य कशात आहे असा प्रश्न जेव्हा आपण मनालाच विचारु लागतो. तेव्हा या रचनेने विविध पैलू स्वतःचं अस काही अस्तित्व आहे तेज आहे त्यातूनच समर्थांचे वौशिष्टय त्यांच समर्थत्व प्रगटत जाते. या समर्थत्वाचा शोध घेणे म्हणजेच समर्थांच्या भक्ती कवितेचे आकलन करणे होय.'' [2]

समर्थांची शिकवण त्यांच्या वाड्.मयात जागोजागी आढळून येते. अगदी दासबोधापासून ते करुणाष्टक सारख्या संपूर्ण आत्मनिष्ठ काव्यामधून रामदासांची समाजनिष्ठाच प्रगट झाली आहे. जे जे विचार त्यांनी मांडले मग ते समाजकारणाविषयी असोत. धर्मकारणाविषयी असोत या सर्वामधून सामाजिक जाणीव प्रभावीपणे आढळते. व्यक्तिगत कर्तव्ये बजावत असतांनाच समाज म्हणून प्रत्येकाचे काय कर्तव्ये आहेत. याकडेही त्यांचा कटाक्ष आहे. आपल्या अवती भोवती जी सामाजिक अराजकता माजली आहे.

त्या अराजकतेमध्ये प्रत्येक हिंदूने सशक्त असले पाहिजे यावर समर्थांचा भर होता. शक्तीची उपासना ही लोकामध्ये,समाजामध्ये रुजविण्यासाठी समर्थांनी अकरा मारुतीची स्थापना केली आणि स्थापन केलेल्या प्रत्येक मठाला प्रबोधनाचे आणि सामर्थ्यांची उपासना करण्याचे केंद्र बनविले. लोकसंग्रह करणे, लोकांना बलोपासनेचे सामर्थ्य पटवून देऊन बलोपासना करणे, नौतिकतेचे उत्तम संस्करण करणे, विविध उत्सवाच्या निमित्ताने समाज संघटन करणे, समाजाला सन्मार्ग दाखविणे, भक्तीमार्गाचा प्रसार व प्रचार करणे अशी अनेक कामे या संस्कारकेंद्रा द्वारे म्हणजेच मठाद्वारे केली जात होती. प्रत्येक मठातील दैनंदिन उपासना, नियोजित उपक्रम हे अत्यंत शिस्तपूर्वक आणि काटेकारपणे व्हावेत आणि पालन करावेत याविषयी समर्थाचा दंडक असे, ''स्वधर्म रक्षणाला समाजाच्या निष्कलक चारित्र्याची संघटीत जीवनाची आणि प्रयत्नवादाची नितांत आवश्यकता असते. म्हणून हे अंतिम साध्य डोळयासमोर ठेवून समाजाच्या अज्ञानातून निर्माण झालेले जडमूढतेचे हीण भस्मसात करुन टाकण्यासाठी सर्व गुणांचा आदर्श अशा पुरुषार्थी प्रभुरुप चंद्रासारख्या दैवताच्या उपासेनेभोवती त्यांनी आपल्या संप्रदायाचे प्रवर्तन केले.''[3]

''सामर्थ्यांची उपासना, सामर्थ्याचे तत्वज्ञान, सामर्थ्याचे पध्दतशीर संघटन यातच समर्थांच्या वाड्. मयाचे समर्थपण साठवले आहे.''[4]

अशा विविध अभ्यासकांच्या विविध मताचा आणि समर्थ वाड्.मयाचा आपण जेव्हा सखोल अभ्यास करतो तेव्हा लक्षात येते की, लोकोद्धाराच्या प्रेरणेमधून प्रामुख्याने समर्थ संप्रदायाची उभारणी झाली आहे. समर्थांनी लोकांच्या मधील आळस शौथिल्य नाकर्तेपणा झाडून त्यांना कर्तृत्वाची दिशा दाखविली. सामर्थ्यांची उपासना रुजविली. प्रयत्नवादाचा पुरस्कार केला. समर्थानी प्रतिपादनकेलेली सर्व तत्त्वे संपूर्ण समाजजीवनाला व्यापणारी आहेत. व्यक्तिच्या आणि समाजाच्या विकासाला ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत. त्या सगळया नौतिक मुल्यांचा पुरस्कार समर्थानी केला आहे. समर्थ संप्रदायातील आराध्य दैवते म्हणजे प्रभू रामचंद्र, हनुमान आणि तुळजाभवानी या दैवतांच्या उपासनेला समर्थांनी एक नवा अर्थ दिला आणि समाजाला योग्य वळण लावले. या विविध दैवतांच्या आराधनेमधून समाजाला शक्तीची उपासना शिकविली आणि संघटन आणि प्रयत्नवादाचे महत्व पटवून दिले. रामदास स्वामींच्या काळाचा म्हणजे तत्कालीन समाजाचा आपण जेव्हा बारकाईने अभ्यास करतो तेव्हा असे लक्षात येते की, त्याकाळी ग्राम दैवतांचे स्तोम माजले होते. देवाधर्माच्या नावाखाली समान्य मानसाची पिळवणूक होत होती. समाज दिशाहिन होता. तंत्रविदयेला समाजात ऊत आला होता. अघोरी पंथाचे प्राबल्य माजले होते. या सर्वांच्या विळख्यात समाज अडकला होता, जर्जर झाला होता. या सगळया अराजकतेमधून समाजाला बाहेर काढण्यासाठी क्षत्रिय धर्माला जागविणाऱ्या देवांची अत्यंत आवश्यकता होती. प्रभू रामचंद्र तर देवांचाही देव आणि हनुमंताची उपासना म्हणजे प्रत्यक्ष शक्तीचीच उपासना, मुक्तीची उपासना. महाराष्ट्राची आराध्य कुलदेवता तुळजाभवानी क्षात्रतेज जागविणारी, अराजकतेचा नायनाट करणारी महिषाशुर मर्दिनी रोकडे मूळ सामर्थ्य आपल्या अंगी यावे म्हणून या देवतांची आराधना शिकविली. सामाजिक अस्थिरतेच्या अराजकतेच्या काळात प्रत्येक हिन्दूने सशक्त असले पाहिजे याकडे समर्थांचा कटाक्ष होता. त्यासाठीच त्यांनी मठाद्वारे लोकसंघटन करुन विविध उत्सवांच्या निमित्ताने लोकांना एकत्र आणले आणि नौतिकतेचे संस्कार करुन बलोपासनेची दिक्षा दिली. दासबोध हा समर्थाचा प्रमुंख ग्रंथ म्हणजे समर्थ संप्रदायाची गीता आहे.

''भारतीय संस्कृतीमधील सगळी श्रेष्ठ तत्वे एकवटून समर्थांनी ती दासबोधामधून प्रगट केली आहे. दासबोध हा समग्र ग्रंथ समाजभिमुख आहे. महंत निर्माण करणे, समाज कार्यकर्ते घडविणे हे त्या ग्रंथाचे मुख्य प्रयोजन आहे. भक्तिमार्गाची उत्कटता आणि भव्यता जीवनाच्या सगळया क्षेत्रात रामदासांना निर्माण करावयाची होती. भक्तीमधील निष्ठा जीवनाच्या सगळ्या कर्तव्यांच्या बाबतीत निर्माण करण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर पार पाडले. समर्थाचा भक्तियोग, ईश्वरासंबंधीची नितांत श्रध्दा जशी बाळगतो.

त्याचप्रमाणे मानवी जीवन व समाज जीवन यासंबंधीची जाज्वल निष्ठाही प्रगट करतो. मानवी जीवनामध्ये जे जे काही उत्तम आहे त्याची उपासना समर्थानी पुरस्कारली.[5]''

सामाजिक जाणिवेचा, सामर्थ्यांचा, मानवी जीवनाच्या विविध कर्तव्याचा तसेच नौतिक मुल्यांचा अविष्कार दासबोध या ग्रंथातून जागोजागी आढळून येतो. मुळात समर्थ वाङ्.मयाचा पाया नौतिकता हाच असल्याचे आढळून येते.

दासबोधाचा अभ्यास करत असताना निदर्शनास येते की, दुसऱ्या दशकातील आठव्या समाजात सव्दिद्येची लक्षणे रामदासांनी सांगितली आहेत. त्यात वैयक्तिक आणि समाजातील गुणांचे एकत्रीकरण आढळून येते.समाजासंबंधी आर्जवी व सख्ययुक्त भावना, परहितासंबंधी मैत्रीची भावना ही त्यांच्या दृष्टीने सद्विद्येची वैशिष्टय आहेत आणि असा सद्विवेकी कार्यकर्ता पुरुषार्थाच्या बळावर जगमित्र बनू शकतो आणि सामर्थ्याच्या बळावर आसुडाचे फटकारे मारुन समाजाला वठणीवर आणू शकतो. उपासक म्हणजे विरक्त नव्हे. त्याने फक्त नाम आणि अध्यात्म यातच गुरफटून राहू नये तर त्याने समाजात मिसळावे समाजाला सामर्थ्यांची उपासना शिकवावी धर्मस्थापना करावी असा समर्थाचा आदेश आहे. विश्वजन उध्दरावा । संसर्ग मात्रे । म्हणजेच विरक्त हा समाज घडविणारा असावा तो जगमित्र असावा विरक्ते असावे जगमित्र । विरक्ते असावे स्वतंत्र । यामध्येच सारासार विचार आहे.

बहुत जनास शहाणे करी । नाना विद्या त्या विवरी । स्थूलसूक्ष्मा । म्हणजे महंताचे किंवा विरक्ताची विद्या ही समाजनिष्ठ असावी अशीच रामदासांची शिकवण आहे. महंताने महंतास घडवावे आणि समाजाच्या उध्दरणासाठी त्यांनी देशभर फिरावे ही संत रामदासांची शिकवण समाजनिष्ठ तर आहेच त्याचबरोबर राष्ट्रनिष्ठही आहे. बाराव्या दशकातील दहाव्या समासातही उत्तम पुरुषाची जी लक्षणे सांगितली आहेत ती समाजा बरोबरच राष्ट्राचे उथ्यान करणारी आहेत. तसेच अठराव्या दशकातील दहाव्या समासातही विवेकाने समर्थ होता येते. याचे प्रतिपादन केले आहे. बहूत जनांसी चालवी । नाना मंडळे हालवी । आणि तोच समर्थ कार्यकर्ता आहे. महंत आहे आणि त्याने समाजापासून वेगळे रहाता म्हणजे अलिप्त रहाता कामा नये. ज्यास समाजात मिसळता येत नाही तो महंत नव्हे. बहुतांमध्ये येकल्याला यश कैसे । हे अतिशय महत्त्वाचे सूत्र त्यांनी जागोजागी स्पष्ट केले आहे.

दासबोध म्हणजे जगण्याचे सुक्त आहे. व्यक्तीने काय करावे, काय करु नये, कसे जगावे कसे वागावे, काय त्यागावे याचे सविस्तर विवेचन आढळून येते. उदा.दासबोधाच्या दुसऱ्या दशकाच्या सुरुवातीला मुर्खाची लक्षणे सांगितली. ज्याचा अव्हेर करावा. सगळा समास ह्या दृष्टीने मननीय आहे. आपल्या अंगी काय नसावे हे जाणण्यासाठी प्रत्येकाने ह्या समासाचे चिंतन करावे. अतिशय साध्या साध्या गोष्टी पण व्यवहाराच्या दृष्टीने खूप महत्त्वाच्या आहेत. उदा.घरी विवेक उमजे। आणि सभेमध्ये लाजे । तो एक मुर्ख । एकाएकी एक सरा । झाला विषयी निलाजरा । मर्यादा सांडूनि सैरा । वर्ते तो एक मुर्ख अशी अनेक लक्षणे वाचून ढोबळ दोषांचे निराकरण आपण करु शकतो. समर्थ कळकळीने सांगतात, शहाणपण उगीच येत नाही ते कमवावे लागते.

समर्थ म्हणतात – ऐकिल्याविण कळले। शिकल्या वीण शहापण आले। देखीले ना ऐकीले भूमंडळी । सकळ काही ऐकता कळे । कळता कळता वृत्ती निवळे । नेमस्त मनामध्ये आकळे । सारासार । जे जे काही श्रवणी पडीले । तितुके समजोन विवरले । तरीच सार्थक झाले निरुपणे ।

थोडक्यात समर्थ वाङ्.मयात चांगले–वाईट, खरे–खोटे, सार–असार, नित्य–अनित्य यामधील विवेक आढळून येतो. त्याचबरोबर व्यक्तिजीवनाच्या संपन्नतेची तत्वे अतिशय सामर्थ्यशाली स्वरुपात आढळून येतात.

**संदर्भ :**


- तर्कतीर्थ श्री.जोशी लक्ष्मणशास्त्री–विश्वकोश खंड–14, पृ.796, प्रकाशक सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई.
- अमरेंन्द्र गाडगीळ– रामदास रामदासी, लेख पृष्ठ–3, महाभारत आणि समर्थांचे प्रपंचविज्ञान 17 जून 1989 सत्कार्योत्तेजक सभा, धुळे
- गोसावी र.रा., पाच भक्तिसंप्रदाय पृ.277 मेहता प्रकाशन पुणे, व्दितीय आवृत्ती 1998
- शेणोलीकर ह.श्री – प्राचीन मराठी वाड्.मयाचे स्वरुप पृ.149 मोघे प्रकाशन कोल्हापूर
- श्री.पुजारी प्रभाकर– सामर्थ्ययोगी रामदास पृ.39, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
- संत रामदासी स्वामी – श्रीमद् ग्रंथराज दासबोध, प्रकाशक चिटणीस सत्कार्योत्तेजक सभा धुळे.